# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.07.2025** **वार- रविवार**

---

**आषाढी**

पुण्यात सर्वत्र आज आषाढी एकादशीचा उत्साह आहे. प्रति पंढरपूर अशी ओळख असलेल्या विठ्ठलवाडी इथल्या विठ्ठल मंदिरासह ठीकठिकणच्या विठ्ठल मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. आषाढी एकादशी निमित्त सर्वच विठ्ठल मंदिरांना आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली आहे. विविध संस्थांनी आषाढी एकादशी निमित्त अभंग, भक्तीगीतांच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे.

**विद्यापीठ**

जागतिक पातळीवरील क्यूएस वर्ल्ड रँकिंगमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जगात ५६६वं स्थान मिळवलं आहे. देशातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाला दुसरं तर राज्यात पाहिलं मानांकन मिळालं आहे. या निमित्तानं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत काल विद्यापीठा मध्ये कौतुक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी पाटील यांनी विद्यापीठाचे कुलगुरू, प्र - कुलगुरू, कुलसचिव यांच्यासह सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सहभागी घटकांचं अभिनंदन केलं. जगातील पहिल्या पाचशे विद्यापीठांच्या क्रमवारीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा समावेश व्हावा यासाठी शासन स्तरावरील सर्व मदत करण्याचं आश्वासन पाटील यांनी दिलं.

**एसटी**

गेल्या तीन महिन्यांत साडेनऊ लाख प्रवाशांनी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून सुरक्षित प्रवास केला आहे. या सेवेतून एसटीला १३ कोटी १४ लाखांहून अधिक उत्पन्न मिळालं असून, ते गेल्या वर्षीच्या तुलनेत दुपटीपेक्षा जास्त आहे, असं राज्य परिवहन मंडळाच्या पुणे विभागानं म्हटलं आहे.

**फळपीकविमा**

मृग बहरातील हवामान आधारित फळपीक विमा योजनेत यंदा द्राक्ष बागायतदारांचा सहभाग गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढला आहे. आतापर्यंत ३१ हजार ३६६ शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे. फळपीक विमा योजनेत डाळिंब पिकासाठी नोंदणी करण्याकरता १४ जुलै आणि सीताफळासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत आहे.

**शाळाबस**

शालेय विद्यार्थ्यांची ने आण करणाऱ्या बस आणि व्हॅनमधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला शासनाचं सर्वोच्च प्राधान्य आहे; वाहनचालक, शिक्षक, पालक आणि शाळा प्रशासनाने या बाबतच्या नवीन नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी करावी असं परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी म्हटलं आहे. पर्वती विधानसभा मतदारसंघातील दोन हजार विद्यार्थ्यांना मिसाळ यांच्या हस्ते आज शालेय साहित्याचं विनामूल्य वाटप करण्यात आलं; त्यावेळी त्या बोलत होत्या.

**पुणेपूल**

पुणे शहरात ८६ मोठे पूल, तर १७० लहान पूल आहेत; त्यापैकी केवळ ३८ पुलांचं संरचनात्मक सर्वेक्षण करण्यात आलं आहे. आणि ११ पुलांच्या दुरुस्तीचं काम सध्या सुरू आहे. शहरातील पुलाचं संरचनात्मक सर्वेक्षण करण्यासाठी एका खासगी कंपनीला काम दिलं जाणार आहे; त्याबाबतच्या

प्रस्तावाला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीनं मंजुरी दिली आहे. मावळ तालुक्यातील कुंडमळा या पर्यटनस्थळी १५ जून रोजी इंद्रायणी नदीवरील लोखंडी साकव कोसळून ४ जणांचा मृत्यू झाला होता; या दुर्घटनेनंतर पुण्यातील धोकादायक पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून ऐंशी ते नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी टिकून असल्याने सर्व फळ भाज्यांचे भाव स्थिर आहेत. मात्र, बटाट्याच्या भावात मोठी घसरण नोंदवण्यात आली. पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर, करडई, कांदापात महागले आहेत. फळ बाजारात आवक घटल्याने डाळिंबाचे भाव वधारले आहेत. आषाढी एकादशी निमित्त फुलांना चांगली मागणी असल्याने सर्वच फुलांचे भाव वधारले आहेत.

**अमलीपदार्थ**

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत कोंढवा इथून १५ लाख रुपयांचे तर बिबवेवाडी इथून ११ लाख रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. दोन्ही भागात गस्त घालत असताना पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणी दोघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खडकवासला**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत आज सकाळपर्यंत 18 पूर्णांक 35 टीएमसी म्हणजे 63 टक्के इतका पाणीसाठा झाला आहे, गेल्या वर्षी याच दिवशी 19 टक्के पाणीसाठा होता. खडकवासला धरणातून आतापर्यंत चार पूर्णांक दहा टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याची माहिती पाटबंधारे विभागानं दिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं, कमाल तापमान 27 तर किमान तापमान 22 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही शहर परिसरात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा तर घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटु विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**